**जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद येथील शिक्षकवर्गीय पदांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरुन ६० करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- वाल्मी-२०१८/प्र.क्र.३३/जल-९**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २४ मे, २०१९

**वाचा :-**
१) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र.इएसटी१००७/(२४६/२००७) /लाक्षेवि (आस्था), दि.२९.५.२००८
२) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र.सेनिवे-२०११/(१२६/११/लाक्षेवि (आस्था), दि.०५.०९.२०११
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८१/ १५/वि.शि.१, दि.१२.०७.२०१६
४) जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद यांचे पत्र क्र.वाल्मी/प्रशासन/ आ-१/१४६०/२०१८ दि.२७.००९.२०१८व २२/५/२०१९ चे पत्र

**प्रस्तावना :-**

जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी) औरंगाबाद, ही जलसंपदा विभागाकडे होती. तथापि, दिनांक ३१.०५.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर संस्थेच्या स्वायत्ततेला बाधा न आणता वाल्मी संस्था मृद व जलसंधारण विभागाकडे वर्ग करुन सदर संस्था मृद व जलसंधारण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यात आली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८१ /१५/वि.शि.१, दि.१२.०७.२०१६ अन्वये राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/ पदविका संस्था/ महाविद्यालयातील अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६२ वर्षे व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/ग्रंथपाल/उपग्रंथपाल/सहाय्यक ग्रंथपाल/ संचालक, उपसंचालक व सहाय्यक संचालक, शारीरिक शिक्षण यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६२ वर्ष करण्याबाबत घेण्यात आलेल्या पूर्वीच्या निर्णयाचा पुनर्विचार करुन सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करण्यात आले आहे. त्यापूर्वी जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.सेनिवे-२०११/प्र.क्र.१२६/११/लाक्षेवि (आस्था), दि.०५.०९.२०११ अन्वये वाल्मी संस्थेतील शिक्षकवर्गीय पदांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६२ वर्ष करण्यात आले होते. वाल्मी संस्थेतील प्राध्यापकांच्या सेवानिवृत्तीच्या वयाचा पूर्वीचा निर्णय हा उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयावर आधारीत होता. त्यामुळे शिक्षकवर्गीय पदांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरुन ६० वर्षे करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय -</u>**

जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद ही १०० % शासन अनुदानित संस्था असून, या संस्थेची स्थापना सोसायटी कायदा, १९६० अंतर्गत करण्यात आली आहे.
राज्य मंत्रीमंडळाच्या मान्यतेने घेण्यात आलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.४८१/१५/वि.शि.१, दि.१२.०७.२०१६ अन्वये राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील शासकीय संस्था/महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय तंत्र महाविद्यालये/ पदविका संस्था/ महाविद्यालयातील अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६२ वर्षे व अकृषि विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/ ग्रंथपाल/उपग्रंथपाल/ सहाय्यक ग्रंथपाल/ संचालक, उपसंचालक व सहाय्यक संचालक, शारीरिक शिक्षण यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ६२ वर्ष करण्याबाबत घेण्यात आलेल्या पूर्वीच्या निर्णयाचा पुनर्विचार करुन सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करण्यात आले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सदर शासन निर्णयाच्या धर्तीवर जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद येथील शिक्षकवर्गीय पदांसाठी (प्रतिनियुक्तीने आलेले प्राध्यापक वगळता) सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षावरुन ६० वर्ष करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा साकेतांक क्र. २०१९०५२४१८३१३०२८२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ambadas Sahebrao Chandanshive

Digitally signed by Ambadas Sahebrao Chandanshive
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Soil and Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=8ec4809bf7e642ce22fdacb42a63ca8410ade167476ac90f3c879facbf715a09,
serialNumber=462d06a8b0c3df3a0b3c93fe66f4d8a55913ce3febb0f6cddf9d398d85d7377c, cn=Ambadas Sahebrao Chandanshive
Date: 2019.05.24 18:35:26 +05'30'

**(अं.सा.चंदनशिवे)**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत,**

१.मा.राज्यपाल यांचे सचिव,

२.मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,

४.मा.सर्व मंत्री / राज्यमंत्री

५.मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य

६. सचिव (मृद व जलसंधारण) मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

७. आयुक्त, मृद व जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद

८.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

९. महासंचालक, जल व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद,

१०.महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर

११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर

१२. सर्व सह सचिव / उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. निवड नस्ती.